# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६.**
ई-मेल: mercindia@mercindia.org.in वेब-साईट www.mercindia.org.in

## प्रेस नोट

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेडने (महावितरण) क्रॉस सबसिडी अधिभाराबाबतच्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या (आयोग) निर्णयाचा फेरविचार करावा अशी विनंती करणाऱ्या याचिकेवर आयोगाचा ९ सप्टेंबर, २०११ निर्गमित झालेला आदेश आणि मुक्त प्रवेश/परिवर्तित (चेंजओव्हर) ग्राहक (गट-२) (आरइन्फ्रा-वितरणच्या वायर्स वापरत असलेले टीपीसीचे ग्राहक) यांनी देय असलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराची नव्याने फेरनिश्चिती करण्याबाबत**

टाटा पॉवर कंपनी-वितरण (टाटा) यांच्याकडून वीज घेत असलेल्या परंतु रिलायन्स इन्फ्रा-वितरण (रिलायन्स) यांच्या वहन यंत्रणेचा वापर करत असलेल्या (गट-२) ग्राहकांना क्रॉस सबसिडी अधिभार लागू करण्यास अनुमती देण्याचा निर्णय आयोगाने २९ जुलै २०११ च्या आदेशानुसार दिला होता.

आयोगाने क्रॉस सबसिडी अधिभाराबाबत दि. ५ सप्टेंबर २००६ रोजी दिलेल्या आदेशाचा आणि क्रॉस सबसिडी अधिभाराची नव्याने निश्चिती करण्याबाबत ९ सप्टेंबर २०११ रोजी दिलेल्या आदेशानुसार गट-२ परिवर्तित ग्राहकांनी क्रॉस सबसिडी अधिभार किती द्यावा याची निश्चिती केली आहे. त्यानुसार निश्चित होणारा क्रॉस सबसिडी अधिभार या आदेशानुसार गट-२ परिवर्तित ग्राहकांना या आदेशाच्या दिनांकापासून यापुढे लागू होणार आहे.

वास्तविक परिवर्तित ग्राहकांना क्रॉस सबसिडी अधिभार परिवर्तनाच्या दिनांकापासून आयोगाच्या वीज दर निश्चिती आदेशानुसार (२९ जुलै २०११) लागू होतो. हा आदेश निर्गमित होण्यापूर्वी क्रॉस सबसिडी अधिभार वर उल्लेख केलेल्या आदेशानुसार (५ सप्टेंबर २००६) शून्य एवढा निश्चित करण्यात आला होता. आजच्या आदेशाने क्रॉस सबसिडी अधिभाराची फेरनिश्चिती करण्यात आली असून हा अधिभार या आदेशाच्या दिनांकापासून लागू होणार आहे.

क्रॉस सबसिडी अधिभार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या ८ जुलै २००८ च्या आदेशानुसार (दिवाणी अपील क्र. २८९८,३४६६ आणि ३४६७, सन २००६) लागू होत आहे. दि. ९ सप्टेंबर २००९ च्या आदेशाने आयोगाने मा.सर्वोच्च न्यायालयाच्या वरील आदेशांचे अनुपालन केले आहे.

आयोगाने व्यापक चर्चा आणि उचित नियामक प्रक्रियेचे पालन करुन, केंद्रीय ऊर्जा मंत्रालयाच्या वीज दर विषयक धोरणात विनिर्दिष्ट करण्यात आलेले क्रॉस सबसिडी अधिभाराचे सूत्र स्वीकारले असून ते विद्युत अधिनियम, २००३ मधील उद्दिष्टांना अनुसरुन आहे. आंध्र प्रदेश विद्युत नियामक आयोगाच्या एका

अपीलावर निर्णय देताना मा. विद्युत अपीलीय न्यायाधिकरणाने असे नमूद केले होते की सर्व नियामक आयोगांनी वीज दर धोरणातील क्रॉस सबसिडी अधिभाराच्या सूत्राचा अवलंब करावा. आयोगाने ९ सप्टेंबर २०११ च्या आदेशान्वये राष्ट्रीय वीज दर धोरणातील सूत्राचा अवलंब केलेला आहे.

दि. ९ सप्टेंबर २०११ च्या आदेशानुसार फेरनिश्चिती केलेल्या क्रॉस सबसिडी अधिभाराची माहिती खालील कोष्टकामध्ये देण्यात आलेली आहे. त्यावरुन असे दिसून येते की परिवर्तित ग्राहकांना देय क्रॉस सबसिडी अधिभार प्रति युनिट अनुक्रमे २६ ते ८३ पैसे राहील. देय क्रॉस सबसिडी अधिभार ग्राहकांच्या वर्गवारीनुसार खालील कोष्टकात दाखविण्यात आला आहे.

| **ग्राहकांची वर्गवारी** | **देय क्रॉस सबसिडी अधिभार (रु./युनिट)** |
|---|---|
| **उच्च-दाब ग्राहक (६६ केव्ही पेक्षा कमी)** | |
| वाणिज्यिक | ०.२६ |
| तात्पुरता पुरवठा | २.२२ |
| **अति-उच्च दाब ग्राहक (६६ केव्ही पेक्षा अधिक)** | |
| वाणिज्यिक | ०.८३ |
| तात्पुरता पुरवठा | २.७९ |
| **लघु-दाब ग्राहक** | |
| बिगर-घरगुती | |
| **'>२० किलो वॉट आणि < ५० किलो वॉट'** | ०.८४ |
| ५० किलो वॉट पेक्षा अधिक | १.९० |
| **घरगुती - सिंगल फेज** | |
| ५०० युनिट आणि अधिक | ०.०३ |
| जाहिरात | ८.३५ |
| तात्पुरते अन्य | ५.५१ |

रिलायन्सकडून टाटाकडे (गट-२) जाणाऱ्या ग्राहकांबाबत क्रॉस सबसिडी अधिभाराचा प्रभाव कितपत पडेल याचे विश्लेषणही आयोगाने केलेले आहे. या विश्लेषणावरुन असे दिसते की परिवर्तित ग्राहकांना क्रॉस सबसिडी अधिभार देय झाल्यानंतरही त्यांना लाभच होणार आहे. हा लाभ उच्च-दाब वाणिज्यिक वर्गवारीसाठी २९.१९ टक्के असेल.

हा सविस्तर आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

(कुलदीप खवारे)
सचिव, मविनि आयोग

९ सप्टेंबर २०११